# इयत्ता दहावी [STD- X] मराठी (००९)

# द्वितीय सत्र नमुना प्रश्न पत्रिका २०२१-२२

**एकूण गुण -४०**

**प्र. १) खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. 7**

वृक्ष आपले गुरू आहेत. निस्वार्थपणा, परोपकार, त्याग हे गुण वृक्षांपासून शिकावेत. ते आपल्या आरोग्याचीही दखल घेतात. ते आपल्या उदरभरणाची काळजी वाहतात. सर्दीपडशापासून ते कॅन्सरसारख्या रोगांवर वनस्पतींपासून औषधे मिळतात. वृक्षांची मुळे जमिनीत ओलावा धरून ठेवतात, तसेच वृक्षांमुळे जमिनीची धूप थांबते, पाऊस पडतो, थंडावा मिळतो. या वृक्षवल्लींनी आपली किती काळजी घ्यावी, ह्याला काही सीमाच नाही. नवनवीन प्रकारच्या वस्त्रनिर्मितीकरता लागणारा धागा निर्माण करण्याच्या प्रक्रियेसाठी, वृक्षवल्लींचीच आवश्यकता असते. म्हणजे आपल्याला रंगीबेरंगी वस्त्रांनी नटवण्यात ह्यांचाच वाटा. आपले घरकुल उभे करण्यात आणि ते फर्निचरने सुशोभित करण्यातही ह्यांचाच वाटा. केसात माळायला फुले देखील ह्यांचीच देणगी. एवढेच कशाला, पाण्यात बुडणाऱ्या माणसाला मिळणारा काठीचा, फळीचा आधार तोही ह्यांचाच. तात्पर्य काय? माणूस हा वृक्षांच्या आधाराशिवाय जगूच शकत नाही आणि असा हा आधारच तोडून टाकाचा? मग आपण जगायचे तरी कसे? शरीरातून हृदयच काढून टाकल्यासारखे नाही का ते? छे, छे! असे करता कामा नये. आपल्या उपकारकर्त्यांवर असा घाला घालणे योग्य नाही. हा घाला घालण्यासाठी लागणारी कुऱ्हाड देखील लाकडाचीच! म्हणजे वृक्ष हवाच!

आजकाल जगात सर्वत्र भलेमोठाले वृक्ष तोडून मोठमोठाले रस्ते, इमारती, कारखाने उभारण्याचा चंग आपण बांधला आहे. सावली देणारे हे वृक्ष आता शहरांमधे औषधालाही सापडत नाहीत. खरंतर माणसे आणि झाडें परस्परांवर अवलंबून आहेत. माणसांचा उच्छवास झाडांना उपयुक्त आणि झाडांना जो वायू त्याज्य तो माणसांना

केवळ प्राण. शहरांमधील प्रदूषणाचे प्रमाण झाडेच तर कमी करू शकतात. अशा ह्या आपल्या मित्राला वाचवायलाच हवे.

**प्र. १ अ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **4**

१. वृक्षवल्ली मानवाची कशी काळजी घेतात?

२. वृक्षांवर घाला घातल्यास काय घडेल?

३. माणसे आणि झाडे परस्परांवर कशा प्रकारे अवलंबून आहेत?

**प्र.१. ब खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाबद्दल तुमचे विचार व्यक्त करा.** **3**

१. आजच्या काळात मानव आणि वृक्षवेलींचा संबंध सुधारण्यासाठी तुम्ही कोणकोणते उपाय सुचवाल?

२. 'झाडे तोडणे म्हणजे जणूकाही शरीरातून हृदयच काढून टाकणे' या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ सांगा?

**प्र.२. अ. खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा.( कोणतेही २)** **4**

१. रघुनाथ माशेलकरांच्या आईला काँग्रेस हाऊसजवळ काम का मिळू शकले नाही?

२. 'रंग साहित्याचे' या नाटिकेत 'कथा' आपल्याला तिच्याविषयी कोणती माहिती देते?

३. निरंजनला भडसावळे गुरुजींनी कशाप्रकारे मदत केली?

४. प्रवासवर्णनाची वैशिष्ट्ये कोणती ?

**प्र.२. ब. खालील प्रश्नांची सुमारे ५० ते ६० शब्दांत उत्तरे लिहा. ( कोणतेही २)** **6**

१. 'माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल'- या भावे सरांच्या सल्ल्यामागचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

२. 'उत्तम लेखक होण्यासाठी उत्तम वाचक होणे आवश्यक असते' या बाबतचे तुमचे विचार स्पष्ट करा.

३. तुम्हाला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**प्र.३.अ. खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २) 4**

१. 'स्वप्न करू साकार' कवितेत कवीने पाहिलेल्या स्वप्नाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

२. 'सीमेवर सैनिक तैनात असतो म्हणून आपण सुरक्षित रहातो' या विधानाचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

३. 'सैनिकांचे पाऊल जिद्दीचे असते' या वाक्यातून कवयित्री इंदिरा संत काय सांगू इच्छितात?

**प्र.३. ब. खालील पद्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कोणतेही १) 3**

१. या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।

२. अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण,
दीनदुबळ्यांचे असे
तुला एकच औक्षण।।

**प्र.३. क खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ५०-६० शब्दांत उत्तर लिहा . 3**

१. व्युत्पत्ती कोशाचे कार्य स्पष्ट करा?

२. 'काळानुसार भाषेत बदल होतात' हे विधान उदाहरणासह स्पष्ट करा.

**प्र.४. अ कंसातील सूचनांनुसार उत्तरे द्या. ( कोणतेही १) 2**

१. काका अभिषेकच्या मागे धावत गेले. (वाक्यातील सामान्यनामाच्या विरुध्द लिंगी शब्दाचा पर्याय वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

२. राघवला कामासाठी घर सोडावे लागले. राघवला खूप वाईट वाटले. (योग्य उभयान्वयी अव्ययाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.)

३. राजाची कीर्ती सर्वदूर पसरली. (वाक्यातील नामे ओळखून प्रकार लिहा)

**प्र.४. ब. कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा. (कोणतेही १)** **2**

१. अक्षर कुलुपावरची अक्षरे उजेडात दिसत असत. (वाक्याचा काळ ओळखून या वाक्याचे वर्तमानकालीन रूपांतर करा.)

२. नाटक सकाळी पाच वाजता आटोपले. (वाक्याचा काळ ओळखा आणि या वाक्याचे भविष्यकालीन रूपांतर करा.)

३. मला निसर्ग ही एक कविताच वाटते. (वाक्याचा काळ ओळखा आणि या वाक्याचे भूतकालीन रूपांतर करा.)

**प्र.४. क. कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा . (कोणतेही १)** **2**

१. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा. (वाक्याचा प्रकार ओळखा आणि विधानार्थी वाक्यात रूपांतर करा.)

२. पाचशे रुपये हीदेखील मोठी रक्कम आहे. (वाक्याचा प्रकार ओळखा आणि नकारार्थी वाक्यात रूपांतर करा.)

३. शाळेची ही वेळ आमच्या सोयीची नाही. (वाक्याचा प्रकार ओळखून होकारार्थी वाक्यात रूपांतर करा.)

४. तुम्ही डोळे मिटावे. (वाक्याचा प्रकार ओळखून प्रश्नार्थी वाक्यात रूपांतर करा.)

**प्र.४.ड. खालील सामासिक शब्दांचा योग्य विग्रह करून समास ओळखा. (कोणतेही १)** **2**

१. न्यायान्याय २. पदोपदी ३. पंचारती

**प्र.५. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा (लिफाफा आवश्यक)** **(5)**

रोहन/राधा चिटणीस, फ्लॅट नंबर 3, बिल्डींग नंबर 2, सहजीवन सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२ हा/ ही महाराष्ट्र विद्युत मंडळ, विभाग पुणे यांना पत्र लिहून स्वतःला आलेल्या वीज बिलाच्या भरमसाठ रकमेची तक्रार करणारे पत्र लिहीत आहे.

**किंवा**

भीमाशंकर अभयारण्यात विविध पक्षी तसेच प्राणी निरीक्षणासाठी सहल आयोजित करायची म्हणून सरस्वती विद्यामंदिर, सोलापूर या शाळेच्या विज्ञान मंडळाचे प्रतिनिधी या नात्याने नीलम / नीरज कुलकर्णी अभयारण्याचे वनक्षेत्रपाल यांना पत्र लिहून अनुमती मागत आहे.